**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४**

क्रमांक कोविमं/ १२वी परीक्षा/ 1707
दिनांक :- २९/०९/२०१८

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय : फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबत**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फेब्रु.-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक (१२ वी) प्रमाणपत्र परीक्षेची नियमीत,पुनर्परिक्षार्थी,नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यर्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.maharashtra.gov.in किंवा www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत शास्त्र कला व वाणीज्य शाखांची फक्त **नियमीत** विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुनऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) पुनर्परिक्षार्थी,यापूर्वी नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित वितरण केंद्राकडे चलनासह विद्यार्थ्यांच्या Excel याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| नियमित शुल्क | सोमवार,दि. ०१/१०/२०१८ ते रविवार दि. २१/१०/२०१८ | सोमवार दि.२२/१०/२०१८ ते मंगळवार दि. ३०/१०/२०१८ | सोमवार दि.१२/११/२०१८ ते शनिवार दि.१७/११/२०१८ | सोमवार दि.१९/११/२०१८ |
| विलंब शुल्क | बुधवार दि.३१/१०/२०१८ ते मंगळवार दि.०६/११/२०१८ ( सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ) | | | |

** **वितरण केंद्रांनी विभागीय मंडळाकडे चलनासह विद्यार्थ्यांच्या Excel याद्या जमा करावयाची तारीख गुरुवार २२/११/२०१८**

** दि.०७/११/२०१८ ते १२/११/२०१८ या कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंट कराव्यात.

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. शासन आदेशानुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमीत विद्यार्थ्यांची शास्त्र,कला व वाणिज्य शाखांची ऑनलाईन आवेदनपत्र स्विकारण्यासाठी SARAL Database मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे. सदर SARAL Data वरुनच नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

Rao general

२. व्यवसाय अभ्यासक्रम (Hsc Vocational Stream) शाखेच्या नियमित,पुनर्परिक्षार्थी,यापूर्वी नांवनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी,श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची माहिती SARAL Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाची आहेत त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं.३ नुसार ) निश्चित करण्यात आल्या आहेत.

३. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियात मंडळाच्या खात्यात जमा करुन बँक चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.कॉलम नं.२ व कॉलम नं.३ मध्ये नमूद केलेनुसार नियमित व विलंबाने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या **Excel याद्या स्वतंत्र कराव्यात.**

४. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.

५. आवेदनपत्रासोबत नियमीत/विलंब शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचा निकाल जाहीर केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर**

Rao general